महसूल व वन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १२ जून २००७

## आदेश

**मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८.**

क्रमांक मुद्रांक. २००७/प्र.क्र. १९६(४)/म-१.—मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ (१९५८ चा मुंबई ६०) याच्या कलम ९ च्या खंड (अ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि या बाबतीत काढलेले सर्व आदेश अधिसूचना किंवा संलेख यांचे अधिक्रमण करून, महाराष्ट्र शासन याद्वारे, शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक पीएसआय. १७०७/(सीआर-५०)/आयएनडी-८, दिनांक ३० मार्च २००७ अन्वये सुरू केलेल्या सामूहिक प्रोत्साहन योजना, २००७ अंतर्गत गट अ आणि गट ब असे वर्गीकरण केलेल्या, बिगर सार्वजनिक क्षेत्रातील माहिती तंत्रज्ञान पार्कमध्ये आणि जैव तंत्रज्ञान पार्कमध्ये नवीन युनिट सुरू करण्यासाठी माहिती तंत्रज्ञान युनिटाने किंवा जैव तंत्रज्ञान युनिटाने निष्पादित केलेले, उक्त अधिनियमासोबत जोडलेल्या अनुसूची-एक मधील [अनुच्छेद ६ (२) खालील] तारण गहाण, तारण, हडप, संलेख, (अनुच्छेद २५ खालील) अभिहस्तांतरणपत्र, (अनुच्छेद ३६ खालील) भाडेपट्टा आणि (अनुच्छेद ४० खालील) गहाण विलेख यांवर आकारणीयोग्य असलेल्या मुद्रांक शुल्काच्या ७५ टक्के इतके मुद्रांक शुल्क १ एप्रिल २००७ रोजीपासून सुरू होणाऱ्या व ३१ मार्च २०११ रोजी संपणाऱ्या कालावधीसाठी पुढील शर्तीवर माफ करीत आहेत :—

**शर्त.**--ज्या कामांसाठी माफी देण्यात आली आहे ती कामे सूरू करण्यात कसूर करणारे किंवा सामूहिक प्रोत्साहन योजना, २००७ याच्या कोणत्याही शर्तीचा भंग करणारे कोणतेही युनिट, जणू काही सुरुवातीपासूनच मुद्रांक शुल्कात घट करण्यात आली नसल्याप्रमाणे, मुद्रांक शुल्क व दंड भरण्यास पात्र ठरेल.

**स्पष्टीकरण.**--या आदेशाच्या प्रयोजनासाठी "माहिती तंत्रज्ञान युनिट" किंवा "जैव तंत्रज्ञान युनिट" याचा अर्थ, सामूहिक प्रोत्साहन योजना, २००७ याच्या खंड २ अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या अंमलबजावणी अभिकरणाने किंवा या बाबतीत त्याने प्राधिकृत केलेल्या इतर कोणत्याही अधिकाऱ्याने बिगर सार्वजनिक क्षेत्रातील

" माहिती तंत्रज्ञान पार्क " किंवा " जैव तंत्रज्ञान पार्क " यामधील युनिट म्हणून प्रमाणित केलेले युनिट, असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**द. रा. माळी,**
शासनाचे सहसचिव.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 12th June 2007

### Order

BOMBAY STAMP ACT, 1958.

No. Mudrank. 2007/C.R. 196(4)/M-1.—In exercise of the powers conferred by clause (*a*) of section 9 of the Bombay Stamp Act, 1958 (Bom. LX of 1958), and in supersession of all the previous orders, notifications or instruments issued in this behalf, hereby remits the seventy five per cent of the stamp duty chargeable on the instrument of the Hypothecation, Pawn, Pledge [under Article 6(2)], Conveyance (under Article 25), Lease (under Article 36), and Mortgage Deed (under Article 40), in the Schedule I appended to the said Act, on the instrument executed by the Information Technology Unit or the Bio-tech Unit for starting a new unit in the Information Technological Park and the Bio-tech Park in the Non-Public Sector Group A and Group B areas classified as such area under the Package Scheme of Incentives, 2007 introduced under the Government Resolution, Industries, Energy and Labour Department, No. PSI. 1707/(CR-50)/IND-8, dated 30th March 2007 for the period commencing from 1st April 2007 to the 31st March 2011 subject to the following condition :—

*Condition.*—Any unit failing to start the activities for which the remission is granted or commits breach of any of the conditions of the Package Scheme of Incentives, 2007, shall be liable to pay the stamp duty and penalty, as if, there was no remission from the beginning.

*Explanation.*—For the purpose of this order, "the Information Technological unit" or "the Bio-tech Unit" means the unit which is so certified by the Implementing Agency specified under clause 2 of the package Scheme of Incentives, 2007 or any other officer authorised by it in this behalf, being the unit in "the Information Technology

Park" or "the Bio-tech Park" in the Non-Public Sector in Group A and Group B.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

D. R. MALI,

Joint Secretary to Government.



शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई